

नगरसेविका सौ.श्रुती राम वाकडकर यांना वाढदिवाच्या शुभेच्छा व अंकदेताना सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे


साप्ताहिक ..वर्ष १९ वे

# प्रगत भारत

Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,,mo.9860877789






● वर्ष:१९ ● अंक क्र.02 ● साप्ताहिक ● मंगळवार दि. २३ ते २९ जून २०२६ ● RNI/MAH/MRA/2008/25149 ● RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 ● पृष्ठे-४ ● किंमत:२.००


## रविदासिया धर्माचे तिसरे पवित्र स्थान निर्माण करणारे सुखदेवजी वाघमारे महाराज यांचे ;चंदीगड येथे निधन

### कात्रज पुणे येथे हजारो रविदासिया भक्तांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार


विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९


**पुणे:कात्रज(पुणे)येथे चर्मकार समाजाच्या आणि देशातील 'रविदासिया'धर्माचे तिसरे पवित्र स्थान निर्माण करणारे सुखदेवजी वाघमारे महाराज वय(७५) वर्ष यांचे २१ जून २०२६ रोजी अल्पशा आजारामुळे चंदीगड(पंजाब) येथे निधन झाले.त्यांचा अंत्यविधी सोमवार,२२ जून २०२६ रोजी सायंकाळी त्यांच्या निवासस्थानी म्हणजेच 'गुरु रविदास मंदिर, तिसरे धर्मस्थान,कात्रज,पुणे' अंत्यविधी करण्यात आला.**

त्यांच्या जाण्याने चर्मकार समाजाची आणि संपूर्ण सामाजिक चळवळीची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे. सुखदेवजी महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य चर्मकार समाजाच्या



उत्कर्षासाठी आणि सेवेसाठी वेचले. कात्रज,पुणे येथे त्यांनी अत्यंत भव्य असे 'संत शिरोमणी रविदास महाराज मंदिर'उभारले,जेआज देशातील रविदासिया धर्माचे तिसरे सर्वात मोठे आणि पवित्र धर्मस्थान मानले जाते.

एक महान कर्मयोगी आणि कट्टर परिवर्तनवादी म्हणून त्यांची देशभरात ख्याती होती.संत रोहिदास महाराज यांच्या सामाजिक क्रांतीच्या विचारांनी आणि कार्यामुळे समाजाला नेहमीच प्रगतीची नवी दिशा मिळाली. सुखदेव वाघमारे महाराज यांचे पार्थिव चंदीगडहून ॲम्युलसनी अंत्यदर्शनासाठी पुण्यात आणण्यात आले होते.

त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन विवाहित मुले असा परिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच देशभरातील अनुयायांमध्ये शोककळा पसरली आहे.**भावपूर्ण श्रद्धांजली:**''सुखदेवजी महाराज यांचे आपल्यातून निघून जाणे ही सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत मोठी हानी आहे. वाघमारे कुटुंबावर कोसळलेले हे अपार दुःख सावरण्याची शक्ती त्यांना देवो,''अशा शब्दांत साप्ताहिक प्रगत भारत'चे संपादक तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे महाराष्ट्र राज्य प्रसिद्धीप्रमुख दत्तात्रय कांबळे यांनी वृत्तपत्र आणि महासंघाच्या परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## गृहनिर्माण संस्थांना कोर्टाचा मोठा झटका!

### स्क्वेअर फूटनुसार मेंटेनन्स आकारण्यास मनाई; शासन निर्णयानुसारच बिल आकारण्याचे आदेश

**मुंबई:महाराष्ट्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मनमानी मेंटेनन्स वसुलीला चाप लावणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालयाने दिला आहे.**

मुंबईतील सांताक्रूझ येथील एका सोसायटीचा अपील अर्ज फेटाळताना न्यायालयाने स्पष्ट केले की, गृहनिर्माण संस्थांना मनमानी पद्धतीने मेंटेनन्स आकारता येणार नाही,तर त्यांना महाराष्ट्र शासनाच्या २९ एप्रिल २००० च्या अधिकृत शासन निर्णयानुसार प्रति-फ्लॅट समान पद्धतीनेच शुल्क आकारावे लागेल.

**कायआहे नेमके प्रकरण?**
सांताक्रूझ (पश्चिम) येथील लिंकिन रोडवर असलेल्या 'वत्सला निवास सहकारी गृहनिर्माण संस्थे'मधील सदनिका क्रमांक २०१ आणि २०३ च्यामालक पूनम सोनी आणि मेसर्स पूनम सोनी सिग्नेचर लाईन प्रा.लि.यांनी सोसायटीच्या मेंटेनन्स बिलांना आव्हान दिले होते. सोसायटी फ्लॅटच्या आकारावर मेंटेनन्स आकारत असल्याचा आणि बिलांमध्ये कोणतीही स्पष्टीकरण न देता अवाजवी रकमा जोडत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. याविरोधात


(सविस्तर बातमी पान क्रमांक ४ वर)




## पुण्यात लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्टच्या विश्वस्त/अध्यक्षपदी उद्योजक पुनीत बालन यांची नियुक्ती; कोर्टाकडून गैरव्यवहाराचे आरोप फेटाळले


(सविस्तर बातमी पान क्रमांक १ वरून)










ॐ कारं बिन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

## संपादकीय

### देशामधील अन्नसुरक्षा व मनुष्याचे आरोग्य धोक्यात..?

भारत देश हा आलीकडच्या काळातच समजूत घेणार असून येथ गरीबा पासून ते श्रीमंत लोक यांच्या मधील फरक आपण समजू शकतो पण आपल्या देशात १० कोटी लोक मधुमेहाने ग्रस्त आहेत, १३ कोटी लोक त्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत, ३१ कोटी लोकांना उच्च रक्तदाब आहे, २५ कोटी लोक स्थूलतेशी झुंज देत आहेत, दरवर्षी १८ ते २० लाख लोकांना मेंदूविकाराचा झटका येतो, कर्करोगग्रस्तांची संख्या २० लाखांच्या पुढे पोहोचत आहे आणि वायुप्रदूषण लाखो लोकांचे प्राण घेत आहे? तरीही काळजीचे कारण नाही. रुग्णालये उघडली आहेत, वैद्यकीय महाविद्यालये सुरू होत आहेत, विमा योजना कार्यान्वित आहेत. आपल्याला काही चिंता करण्याचे कारण नाही. चिंता असली तरी आपण काय करू शकतो? पर्यायांच्या अभावाची ही सक्ती आहे. म्हणून आपण देवाच्या भरवशावर आहोत. सरकारच्या खैरातींची बरसात सुरूच आहे. आता आपणच स्वत:ला आजारांपासून वाचवू शकलो नाही, तर त्यात दुसरे कोण काय करणार? म्हणून प्रारब्धाला दोष द्या आणि रस्त्याकडेला मिळणारे मोमो, चाऊमीन आणि चाट यांचा आस्वाद घेत राहा.युरोपियन देशांनी भारतातून निर्यात होणाऱ्या फळे-भाजीपाल्यावर निर्बंध आणले.आपण विश्वास ठेवणारे लोक आहोत. दुकानदाराने एकदा सांगितले की, सर्व काही शुद्ध आहे की आपण मानून टाकतो. हळदीचा पिवळेपणा एखाद्या कृत्रिम रंगामुळे आहे की नाही, याची आपल्याला चिंता नसते. पाकिटावर शुद्ध असे लिहिलेले असते, म्हणजे सर्व काही उत्तमच असणार. आपल्या पणजोबांच्या काळापासून हेच खाल्ले जात आहे. आपल्याला काही चिंता करण्याचे कारण नाही. चिंता असली तरी आपण काय करू शकतो? पर्यायांच्या अभावाची ही सक्ती आहे. म्हणून प्रारब्धाला दोष द्या आणि रस्त्याकडेला मिळणारे मोमो, चाऊमीन आणि चाट यांचा आस्वाद घेत राहा.अलीकडेच एक बातमी वाचनात आली. एखाद्या कोपऱ्यात लहानशी छापून आली होती आणि तशीच विरूनही गेली. बातमी अशी होती की, युरोपियन युनियनने भारतातून जाणाऱ्या फळे, भाज्या आणि इतर अनेक खाद्यपदार्थांवर निर्बंध घातले आहेत. कारण त्यामध्ये जड धातू, कीटकनाशके आणि रासायनिक घटकांचे असे प्रमाण आढळले, जे कर्करोगास कारणीभूत ठरू शकते आणि म्हणूनच युरोपमध्ये निषिद्ध मानले जाते. याआधी जपाननेही याच कारणामुळे भारतातील आंबे स्वीकारण्यास नकार दिला होता. आपल्या वस्तूंना, विशेषतः अन्नपदार्थांना, यापूर्वीही अनेकदा परदेशी बाजारपेठांनी नकार दिलेला आहे. त्यामुळे हा काही नवीन प्रकार नाही. म्हणूनच अशा बातम्या मोठ्या मथळ्यांत झळकत नाहीत. वर्तमानपत्रात एखाद्या सूचनेप्रमाणे छापून येतात आणि दूरचित्रवाणीवर तर त्यांना स्थान मिळण्याची शक्यताच नसते. आश्चर्य वाटण्यासारखेही काही नाही. ही काही फार मोठी गोष्ट नाही. आपण तर सर्व काही खातो. हे जड धातू, कीटकनाशके, रासायनिक अवशेष वगैरे नेमके काय असते, हे आपल्याला ठाऊकही नसते. कुणी सांगितलेलेही नसते. आणि सांगण्याची गरज कुणाला वाटलेलीही नसते. देशात असंख्य समस्या डोक्यावर आहेत. पोटभर अन्न मिळाले तरी मोठी गोष्ट मानली जाते. धान्य, भाजीपाला आणि फळांमध्ये रसायने आहेत की नाहीत, याचा विचार कधीतरी फुरसत मिळाली तर करता येईल.आपण विश्वास ठेवणारे लोक आहोत. दुकानदाराने एकदा सांगितले की सर्व काही शुद्ध आहे की आपण मानून टाकतो. युरोप-अमेरिकेतील लोक जरा जास्तच भित्रे असावेत. पैसा अधिक झाला की नखरेही वाढतात. त्यांना कोण समजावणार की १५० कोटी लोक शेतीतून येणारी प्रत्येक गोष्ट डोळे झाकून खातात. आपल्या वस्तूंवर बंदी घालणे ही नक्कीच एखादी कटकारस्थानाची बाब असावी. त्यांना आपला हेवाही वाटत असणार. आपल्या वस्तूंमध्ये काही दोष असता तर सरकारने आपल्याला सांगितले नसते का? सरकारने सांगितले नाही, म्हणजे सर्व काही अगदी शुद्ध आहे, एवढेच. फळे-भाज्या धुऊन घेतल्या की त्यांच्यावरील सर्व रासायनिक पापे धुऊन निघून जातात, असे आपण समजतो. दूध उकळले की ते स्वच्छ झाले, असे मानतो.मसाल्यांच्या पाकिटावर शुद्ध असे लिहिलेले असते, म्हणून त्यावर विश्वास ठेवतो. कधीकाळी 'रविवार असो की सोमवार, रोज खा अंडी' असा सरकारी प्रचार झाला होता. त्यामुळे आजही आपण अंड्यांमधून ताकद मिळवत आहोत. मात्र अंड्यात नेमके काय आहे, हे जाणून घेण्याची गरज आपल्याला वाटत नाही.आगीमध्ये तापवले आणि पाण्याने धुतले की सर्व काही निष्कलंक होते, अशी आपली धारणा आहे.

## शालेय शिक्षणापासूनच मुलांना योगाचे धडे देणे काळाची गरज;आमदार शंकर जगताप यांचे प्रतिपादन


**पिंपरी:''शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी योगाभ्यास ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. आजच्या गतिमान युगात लहान वयातच मुलांमध्ये शारीरिक व मानसिक ताणतणाव वाढताना दिसत आहेत. भविष्यातील आरोग्याची गुंतागुंत प्राथमिक स्तरावरच रोखायची असेल, तर शालेय शिक्षणापासूनच मुलांना योगाचे धडे देणे अत्यंत आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी केले आहे.**



सांगवी येथे भव्य योग शिबिराचे आयोजन: आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून सांगवी-पिंपळे गुरव मंडल अंतर्गत राजमाता जिजाऊ उद्यान येथे एका भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात आमदार शंकर जगताप यांनी स्वतः उपस्थित राहून स्थानिक नागरिकांसोबत विविध यो-गासने आणि प्राणायाम केला. यावेळी त्यांनी भावी पिढी सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी शालेय स्तरावर योगाची मोठी जनजागृती होणे गरजेचे असल्याचे सांगितले. लहान वयातच योगाची सवय लागल्यास मुलांची एकाग्रता वाढेल आणि भविष्यात उद्भवणारे गंभीर आजार सुरुवातीलाच टाळता येतील, यावर त्यांनी विशेष भर दिला.पंतप्रधान मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचा गौरव: कार्यक्रमात बोलताना आमदार जगताप म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अथक प्रयत्नांमुळे योगाला आज जागतिक स्तरावर एक नवी आणि जाज्वल्य ओळख मिळाली आहे. यंदाचा योग दिन '१२ वर्षे जनसेवेची, जनकल्याणाची' या विशेष संकल्पनेने साजरा होत आहे. महाराष्ट्रातही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली योग चळवळीला मोठी गती मिळाली असून, त्यांच्या क्रीडा व आरोग्य धोरणांच्या माध्यमातून योग संस्कृती राज्यातील तळागाळातील नागरिकांपर्यंत यशस्वीपणे पोहोचली आहे.
नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि संकल्प: या शिबिराचे नेटके आयोजन माजी नगरसेवक शशिकांत कदम, श्याम जगताप, ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप आणि माजी नगरसेविका पल्लवी महेश जगताप यांनी केले होते. प्रसिद्ध योगशिक्षक मीना पवार यांनी उपस्थितांना प्राणायाम व विविध योगासनांचे प्रात्यक्षिकांसह शास्त्रशुद्ध मार्गदर्शन केले. सांगवी आणि परिसरातील शेकडो नागरिकांनी, महिलांनी आणि तरुणांनी या शिबिराला उत्स्फूर्त उपस्थिती लावून दैनंदिन जीवनात नियमित योगासने करण्याचा संकल्प केला.

## नाना काटे सोशल फाऊडेशन व आर्ट ऑफी लिव्हिंग पिंपळे सौदागर याच्यां संयुक्त योग दिन साजरा

**पिंपरी:**-२१ जुन हा भारतात आतरराष्ट्रीय योग दिन म्हणुन साजरा केला जातो नाना काटे सोशल फाऊंडेशन व आर्ट ऑफ लिव्हिंग पिंपळे सौदागर यांच्या वतीने दरवर्षी कुंजीर क्रिडांगण पिंपळे सौदागर येथे सामुहीक योग शिबिराचे आयोजन केले जाते,या वर्षी देखील २१ जुन २०२६ रोजी या योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या योग शिबिरात परिसरातील नागरिक,युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली,मानसिक स्वास्थ्य,शारीरिक तंदुरुस्ती आणि सकारात्मक जीवनमूल्ये



समाजात रुजविण्याचा या शिबाराचा उपक्रमामागील मुख्य उद्देश असतो.भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी असलेल्या योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली असून आज योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून संपूर्ण जीवनशैली बनला आहे.वाढता ताणतणाव, बदलती जीवनशैली आणि आरोग्याच्या समस्या लक्षात घेता नियमित योगाभ्यासाची गरज अधिक अधोरेखित होत आहे. याच पार्श्वभूमीवर नाना काटे सोशल फाऊंडेशन यांच्या वकीने आर्ट ऑफ लिव्हिंगचा माध्यमातुन नागरिकांना योगाशी जोडण्याचा दरवर्षी हा संकल्प केला आहे. यावेळी नागरिकांना संबोधताना नाना काटे यांनी ''योग ही भारताची जगाला दिलेली महान देणगी आहे. प्रत्येक नागरिकाने योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवून निरोगी आयुष्यासाठी योगदान द्यावे असे आव्हान देखील उपस्थित नागरिकांना नाना काटे यांनी केले या कार्यक्रमावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे दत्ता आलेकर,निशा लुल्ला,उमा कुलकर्णी,शशांक खांडेकर,सामाजिक कार्यकर्ते अनिल काटे, उमेश काटे,काळुराम कवितके,संतोष मस्कर, संतोष मिश्रा,रवि मुंढे, विनोद सुर्वे,अमरिश जोशी,संदेश घाटे, जयेश सरोदे, दिपक काळे, सतिश डोंगरे, चेतन पाटील,विलास काका जोशी, व परसिरातील सोसायटी मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा भव्य मेळावा: कामगारनेते यशवंतभाऊ भोसले कंबर कसून मैदानात!

**पिंपरी:पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील संघटनेच्या सभासद कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी,आज (दि.२१) पिंपरीतील संत तुकाराम नगर येथे राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने एका भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले**



**उपस्थित होते.** या प्रसंगी बोलताना अध्यक्ष यशवंतभाऊ भोसले यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, ''गेल्या १८ वर्षांपासून आमची संघटना महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या न्यायिक हक्कासाठी आम्ही पूर्ण ताकतीने काम करत आहोत. कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक समस्येवर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी संघटना सदैव तत्पर आहे.'' मेळाव्यात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या समस्या मांडल्या,ज्यावर यशवंतभाऊ भोसले यांनी सविस्तर चर्चा करून त्या सोडवण्याचे आश्वासन दिले.. यावेळी मोठ्या संख्येने महानगरपालिकेतील सभासद कर्मचारी उपस्थित होते. शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या मेळाव्यात कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचे दर्शन घडले.

## गृहनिर्माण संस्थांना कोर्टाचा मोठा झटका! स्क्वेअर फूटनुसार मेंटेनन्स आकारण्यास मनाई;शासन निर्णयानुसारच बिल आकारण्याच आदेश

(क्रमशः बातमी पान क्रमांक १ वरून )

न्यायालयात धाव घेतली होती.१५.३३ लाखांच्या थकबाकीचे रहस्य आणि कोर्टाची चपराक या प्रकरणात न्यायालयाने सोसायटीच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.११ डिसेंबर २०२३ च्या बिलात सदनिका क्रमांक २०१ वर कोणतीही थकबाकी दाखवण्यात आली नव्हती.
मात्र, २१ मार्च २०२४ च्या बिलात अचानक १५ लाख ३३ हजार रुपयांची थकबाकी दाखवण्यात आली. या अचानक वाढलेल्या रकमेचे कोणतेही कॅल्क्युलेशन किंवा ब्रेकअप सोसायटीला कोर्टात सादर करता आले नाही.धक्कादायक बाब म्हणजे,सदनिका धारकांनी यापूर्वीच सोसायटीच्या विविध कामांसाठी आणि नियमितीकरणासाठी अनुक्रमे ३६.४४ लाख आणि ३७.९० लाख रुपये भरले होते, तरीही सोसायटीकडून कोणतीही पडताळणी न देता १७.२६ लाख रुपयांची (१५.३३ लाख मुद्दल + व्याज) नवी मागणी केली जात होती.
अपील न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण व आदेश ट्रायल कोर्टाने सोसायटीला १७.२६ लाख रुपयांच्या वसुलीला स्थगिती दिली होती, त्यावर सोसायटीने केलेले अपील (अपील क्रमांक ४९/२०२५) वरिष्ठ सहकारी अपील न्यायालयाने फ`टाळून लावले.
**न्यायालयाने गृहनिर्माण संस्थांसाठी खालील महत्त्वाचे नियम अधोरेखित केले:**
१. क्षेत्रफळावर आधारित मेंटेनन्स बेकायदेशीर: गृहनिर्माण संस्थांनी फ्लॅटच्या स्क्वेअर फूटवर मेंटेनन्स आकारणे हे शासकीय मार्गदर्शक तत्त्वांच्या पूर्णपणे विरोधात आहे. २. पारदर्शकता अनिवार्य: गृहनिर्माण संस्था केवळ दाव्यांच्या आधारे मेंटेनन्स मागू शकत नाहीत. प्रत्येक पैशाचा हिशोब, ब्रेकअप आणि लेखापरीक्षण सभासदांना देणे बंधनकारक आहे.३.समान न्याय: एकाच इमारतीतील एकाच आकाराच्या दोन फ्लॅटपैकी एकालाच अचानक १५ लाखांची थकबाकी लावण्याच्या विसंगतीवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.न्यायालयाने वत्सला निवास सोसायटीला पुढील ३ महिन्यांत या थकीत रकमेचे संपूर्ण कॅल्क्युलेशन सादर करण्याचे आदेश दिले असून, तोपर्यंत केवळ प्रति-युनिटनुसार नियमित मेंटेनन्स आकारण्याची परवानगी दिली आहे.

प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे-१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे-मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे-१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०७७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी) ● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday
POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026 'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdion

# श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २०२६ चे वेळापत्रक जाहीर


विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९



**पुणे:**आषाढी वारीनिमित्त जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या पायी पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर श्री क्षेत्र देहू येथून पालखी सोहळा मंगळवार,७ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजता पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.पहिला मुक्काम देहू येथील इनामदार वाड्यात होणार आहे. ८ जुलै रोजी पालखी पिंपरी-चिंचवड परिसरात प्रवेश करणार असून,आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात मुक्काम होईल. त्यानंतर ९ व १० जुलै रोजी पालखी पुण्यातील नाना पेठ येथील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी राहणार आहे.पुढील प्रवासात लोणी काळभोर,यवत,वरवंड, उंडवडी गवळ्याची,बारामती, सणसर,निमगाव केतकी, इंदापूर, सराटी, अकलूज,बोरगाव, पिराची कुरोली आणि वाखरी या ठिकाणी पालखीचे मुक्काम होणार आहेत.२४ जुलै २०२६ रोजी पालखी श्री क्षेत्र पंढरपूर येथे दाखल होणार असून,२५ जुलै रोजी आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा होणार आहे.या सोहळ्यात राज्यभरातून लाखो वारकरी सहभागी होतात.टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि विठ्ठल भक्तीच्या वातावरणात देहू ते पंढरपूर हा भक्तिमय प्रवास पार पडतो. प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्थानिक संस्थांकडून वाहतूक,आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची तयारी करण्यात येत आहे.

**मुख्य वेळापत्रक तारीख मुक्काम/ठिकाण-**
७ जुलै रोजी देहू इनामदार वाडा येथे मक्काम तसेच ८ जुलै रोजी आकुर्डी श्री विठ्ठल मंदिर येथे मक्काम तसेच ९ व १० जुलै रोजी पुणे नाना पेठ येथे मुक्काम तसेच ११ जुलै लोणी काळभोर येथे मुक्काम व १२ जुलै यवत येथे मुक्काम तसेच १३ जुलै वरवंड येथे पालखी मुक्काम १४ जुलै रोजी उंडवडी गवळ्याची येथे मुक्काम तसेच १५ जुलै बारामती येथे पालखी मुक्काम १६ जुलै सणसर येथे पालखी मुक्काम १७ जुलै निमगाव केतकीयेथे पालखी मुक्काम १८ जुलै येथे पालखी मुक्काम व तसेच इंदापूर१९ जुलै सराटी येथे पालखी मुक्काम २० जुलै अकलूज२१ येथे पालखी मुक्काम जुलैबोरगाव२२ जुलैपिराची कुरोली२३ जुलैवाखरी२४ जुलैपंढरपूर आगमन२५ जुलैआषाढी एकादशी सोहळा

# संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२६ याची तारीख व ठिकाणे:तारीखमुक्काम ठिकाण



संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषाढीवारी पालखी सोहळा २०२६ शेके १९४८ सन २०२६ श्री क्षेत्र आळंदी ते श्री क्षेत्र पंढरपूर व श्री गुरु हैबतबाबांनी १८३२ साली संत ज्ञानेश्वर महाराजांचा स्वतंत्र पालखी सोहळा सुरू केला होता.असे समजले जाते त्यमुळे मिळालेल्या माहिती नुसार संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या १९५ व्या पालखी सोहळ्याचे आगमन म्हणजे श्रद्धा, भक्ती आणि समतेचा दिव्य संगम होय.प्रस्थान:दि. ०८ जुलै २०२६, दुपारी ३:०० वा.श्री क्षेत्र आळंदी येथून प्रस्थानआषाढी एकादशी:शनिवार, दि. २५ जुलै २०२६

पालखी सोहळ्याचे **मुख्य वेळापत्रक तारीख मुक्काम/ठिकाण**-०८/०७/२०२६ गांधी वाडा येथे पालखी मुक्काम ०९/०७/२०२६ भवानीपेठ,येथे पालखी मुक्काम पुणे१०/०७/२०२६पुणेयेथे पालखी मुक्काम ११/०७/२०२६सासवड येथे पालखी मुक्काम १२/०७/२०२६ सासवड येथे पालखी मुक्काम१३/०७/२०२६जेजुरीयेथे पालखी मुक्काम १४/०७/२०२६वाल्हे येथे पालखी मुक्काम १५/०७/२०२६लोणंद येथे पालखी मुक्काम१६/०७/२०२६ तरडगाव येथे पालखी मुक्काम १७/०७/२०२६ पालखी मुक्काम तसेच फलटण तसेच दिनांक१८/०७/२०२६ रोजी येथे बरड येथे पालखी मुक्काम व १९/०७/२०२६ रोजी नातेपुत येथे पालखी मुक्काम दिनांक २०/०७/२०२६ माळशिरस येथे पालखी मुक्काम तसेच २१/०७/२०२६वेळापूर येथे पालखी मुक्काम दिनांक २२/०७/२०२६ पालखी मुक्काम भंडीशेगाव येथे पालखी मुक्काम तसेच २३/०७/२०२६ खरी येथे पालखी मुक्काम व २४/०७/२०२६पंढरपूर येथे पालखी मुक्काम

# भाजपा पिं.चि.शहर उपाध्यक्ष राम वाकडकर आणि नगरसेविका श्रुती राम वाकडकर यांच्या वतीने वाकड येथे भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन




विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**वाकड:-आंतरराष्ट्रीय योग दिन तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष राम हनुमंत वाकडकर आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण समिती सदस्या तथा नगरसेविका सौ.श्रुती राम वाकडकर यांच्या वतीने वाकड येथे भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.मॅचडे अरेना,दत्त मंदिर रोड,वाकड येथील सौ. श्रुतीताई रामभाऊ वाकडकर यांच्या जनसंपर्क कार्यालयामागील मैदानावर सकाळी ७ ते ९ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक,महिला,युवक-युवती तसेच मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध योगासने व प्राणायामाचा सराव केला.यावेळी बोलताना राम हनुमंत वाकडकर यांनी सांगितले की, योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारा हा जीवनमार्ग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला असून आज जगातील १९० हून अधिक देश योग दिन साजरा करत आहेत. निरोगी समाज आणि सशक्त राष्ट्र उभारण्यासाठी योगाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगरसेविका तथा शिक्षण समिती सदस्या सौ. श्रुती राम वाकडकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, धावपळीच्या जीवनात स्वतः च्या आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. योग ही केवळ काही आसनांची मालिका नसून निरोगी, आनंदी आणि सकारात्मक जीवन जगण्याची पद्धत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी योगाला दैनंदिन जीवनाचा भाग बनवावा,असे आवाहन त्यांनी केले. वाकड परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून निरोगी समाज घडविण्याबाबत नागरिकांची जागरूकता आणि बांधिलकी दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे, योग प्रशिक्षकांचे तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे आयोजकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. ‘‘निरोगी कुटुंब, निरोगी समाज आणि विकसित भारतासाठी दररोज योग करूया’’, असा संदेश देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# पोलीस आयुक्तांना भेटण्याच्या वेळेत पुन्हा बदल..!

**पिंपरी:**-पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या ‘पोलीस आयुक्तांची भेट’या उपक्रमाच्या दिवस आणि वेळेत प्रशासकीय कारणास्तव पुन्हा एकदा बदल करण्यात आला आहे.

आता हा उपक्रम सोमवार ऐवजी दर शुक्रवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत पार पडणार आहे.हद्दीतील नागरिकांना आणि तक्रारदारांना थेट पोलीस आयुक्तांना भेटून आपल्या समस्या, तक्रारी आणि सूचना मांडता याव्यात, यासाठी या विशेष



उपक्रमाचे आयोजन केले जाते. यापूर्वी या उपक्रमाच्या वेळेत दोनदा बदल झाले आहेत. सुरुवातीला हा उपक्रम दर सोमवारी दुपारी ४ ते ६ या वेळेत होत होता, त्यानंतर तो दुपारी ३ ते ५ असा करण्यात आला. आता नागरिकांच्या सुविधेसाठी आणि प्रशासकीय कारणांमुळे यात तिसऱ्यांदा बदल करण्यात आला आहे. आता हा उपक्रम दर शुक्रवारी सकाळी अकरा ते दुपारी एक वाजताच्या दरम्यान होणार आहे. त्यामुळे सोमवारी (दि.२२ जून) रोजी जनसंवाद हा उपक्रम होणार नाही. त्याऐवजी शुक्रवारी (दि.२६ जून) रोजी सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत आणि त्यानंतर सर्व शुक्रवारी याच वेळेत होणार असल्याचे जनसंपर्क विभागाने कळविले आहे.

# मानधनावरील नर्सेसना न्याय देण्याची महापौर आणि स्थायी समितीचे सभापतींची ग्वाही-कामगारनेते यशवंत भोसले

**पिंपरी:**-पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल आणि इतर वैद्यकीय विभागांमध्ये गेली १५ ते १८ वर्षे अवघ्या १० ते १५ हजार रुपयांच्या तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या १४२ नर्सेस आणि टेक्निकल स्टाफला कायमस्वरूपी (परमनंट) करण्याऐवजी,त्यांच्या हक्काच्या जागेवर नवीन भरती करण्याचा घाट तत्कालीन प्रशासनाने घातला होता.मात्र,राष्ट्रीय श्रमिक आघाडीने या अन्यायाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत नवीन भरतीला स्थगिती मिळवली आहे.

आता या भगिनींना न्याय मिळवून देण्यासाठी महापौर रवी लांडगे आणि स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले असता दोघांनी मानधनावरील नर्सेसना न्याय देण्याची ग्वाही दिली तसेच शहरातील आमदार,खासदार व सर्व लोकप्रतिनिधींनी सहकार्य करण्याची भूमिका दर्शवली असल्याची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंत भोसले यांनी पिंपरी येथे पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी कामगारनेते यशवंत भोसले म्हणाले की,या परिचारिकांनी आपल्या आयुष्याची १८ वर्षे पालिके सेवेत घालवली आहेत.२०२० मधील कोरोनाच्या भयानक महामारीत स्वतः च्या जिवाची पर्वा न करता,तीन-तीन महिने घराचे तोंड न पाहता त्यांनी रात्रंदिवस सेवा केली. कित्येक नर्सेस तिथेच आजारी पडल्या,ॲडमिट झाल्या आणि बऱ्या होऊन पुन्हा कामावर हजर झाल्या.त्यांच्या या त्यागाची दखल घेऊन २०२० मध्ये महापालिका सभागृहाने या सर्व नर्सेसना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याचा ऐतिहासिक ठराव मंजूर केला आणि तो मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठवला.

परंतु, नगरसेवकांचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर पालिकेवर प्रशासक नियुक्त झाले. तत्कालीन प्रशासक शेखर सिंग यांनी लोकप्रतिनिधींच्या या सर्वोच्च सभागृहाच्या ठरावाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे,तर तो ठरावच विखंडित (रद्द) करून नर्सेसच्या जागांवर नवीन भरतीचा प्रस्ताव सरकारला पाठवला. समान काम करणाऱ्या इतर परमनंट सिस्टर्सना सातव्या वेतन आयोगानुसार ८० हजार रुपये पगार व सर्व सुविधा मिळत असताना,गेली १८ वर्षे सेवा देणाऱ्या या नर्सेसना मात्र २१ ते २२ हजारांवर राबवले जात आहे आणि आता त्यांनाच कामावरून काढून नवीन मुलींची भरती करण्याचा हा डाव अत्यंत अन्यायकारक होता,असे भोसले म्हणाले.

प्रशासकाच्या या हुकूमशाही निर्णयाविरोधात राष्ट्रीय श्रमिक आघाडीने तातडीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने याची गंभीर दखल घेत नवीन भरतीला स्थगिती दिली,तसेच या कर्मचाऱ्यांना कामावरून न काढण्याचे आणि मूळ ठरावावर त्वरित निर्णय घेण्याचे आदेश दिले. सभागृह हे सर्वोच्च असताना एका काळजीवाहू प्रशासकाने तो ठराव कोणत्या अधिकारात विखंडित केला,असा सवाल उपस्थित करत उच्च न्यायालयाने प्रशासकाला तात्काळ ‘रिप्लाय फाईल’ करण्याचे आदेश दिले होते. मात्र, तो रिप्लाय फाईल करण्यापूर्वीच शेखर सिंग यांची बदली झाली. शहराचे भाग्य चांगले की आता प्रशासकीय राजवट संपून सामाजिक जाण असणारे लोकप्रतिनिधी महापालिकेत निवडून आले आहेत. तरुण व तडफदार महापौर रवीजी लांडगे साहेब, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे साहेब, उपमहापौर शर्मीलाताई बाबर तसेच पक्षनेते प्रशांत शितोळे यांची भेट घेतली आहे. प्रशासकाने विखंडित केलेला तो जुना ठराव रद्द करून, नर्सेसना कायम करण्याचा मूळ ठराव पुन्हा मंजूर करून घ्यावा, अशी विनंती केली आहे.यावर महापौरांनी सकारात्मकता दर्शवली असून लवकरच याबाबत आयुक्त आणि पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे,आमदार महेशदादा लांडगे, आमदार शंकर जगताप, विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे,आमदार उमा खापरे आणि सर्व नगरसेवक तसेच सर्व लोकप्रतिनिधी मानधनावरील नर्सेसना सर्वोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

## ...दत्त मंदिर ट्रस्टच्या विश्वस्त/अध्यक्षपदी उद्योजक पुनीत बालन यांची नियुक्ती

**(सविस्तर बातमी पान क्रमांक १ वरून)**

**पुणे:पुण्यातील अत्यंत मानाच्या आणि ऐतिहासिक ‘श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट’च्या नव्या विश्वस्त मंडळाची घोषणा करण्यात आली आहे. या नव्या कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध तरुण उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते पुनीत बालन यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली आहे.**

धर्मादाय आयुक्तांच्या निर्देशानुसार हे नवीन विश्वस्त मंडळ अंतिम करण्यात आले असून भाविकांकडून या निवडीचे स्वागत होत आहे.अशी आहे नवीन कार्यकारिणी: नव्याने जाहीर झालेल्या नियुक्त्यांनुसार, पुनीत बालन यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. **याशिवाय:कार्यकारी विश्वस्त:**राजू बलकवडे उपाध्यक्ष:ॲडव्होकेट विवेक भारगुडे आणि वर्षा तोरवे खजिनदार:सूरज थोरात उत्सव प्रमुख:नितीन पंडितउपउत्सव प्रमुख:मनिषाताई खेडेकर विश्वस्त:पराग काळकर आणि महेंद्रशेठ गाढवेकोर्टाकडून तक्रारी फेटाळल्या; निवडणूक प्रक्रिया वैध या विश्वस्त निवडीच्या प्रक्रियेवर काही व्यक्तींनी आक्षेप घेत गैरव्यवहार आणि अनियमिततेचे आरोप केले होते.या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यानंतर,न्यायालयाने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.निवडणूक प्रक्रियेत कोणतीही अनियमितता झाली नसल्याचा स्पष्ट निर्वाळा कोर्टाने दिला. त्यानंतरच धर्मादाय आयुक्तांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून या अधिकृत विश्वस्त मंडळाची स्थापना करण्यात आली.**परंपरा जपणे आणि सामाजिक कार्याला प्राधान्य:**पुनीत बालन आपल्या नियुक्तीवर प्रतिक्रिया देताना नवनिर्वाचित अध्यक्ष पुनीत बालन म्हणाले की,‘‘धर्मादाय आयुक्तांच्या आणि न्यायालयाच्या या निर्णयामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.दत्त मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून मंदिराच्या प्राचीन परंपरा,भाविकांची श्रद्धा आणि सांस्कृतिक वारसा यांचे जतन करणे ही आमची पहिली प्राथमिकता असेल.आगामी काळात भाविकांच्या सुविधेसाठी आणि समाजातील वंचित घटकांसाठी अधिक कल्याणकारी व सेवाभावी उपक्रम राबवून ट्रस्टची सामाजिक जबाबदारी आम्ही अधिक सक्षमपणे पार पाडू.’’

# नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान; पक्षाचे कार्य शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा:शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे आवाहन



विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**पिंपरी:भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी विविध प्रकोष्ठांच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना अधिकृत नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली आहेत. मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात आयोजित भव्य कार्यकारिणी नियुक्ती सोहळ्यात भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. ''भाजप हा कार्यकर्त्यांच्या बळावर उभा असलेला पक्ष असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्षाची विच-ारधारा आणि केंद्र-राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवाव्यात,'' असे आवाहन त्यांनी या वेळी केले.**

**अनेक प्रकोष्ठांच्या अध्यक्षांची घोषणा:** चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यामध्ये प्रामुख्याने वैद्यकीय, अभियांत्रिकी,ओबीसी मोर्चा, वक्तृत्व प्रशिक्षण आणि दिव्यांग सेलच्या प्रमुखांना जबाबदारी देण्यात आली. आमदार जगताप यांच्या उपस्थितीत चेतन भुजबळ (अध्यक्ष,ओबीसी मोर्चा), डॉ.अमित नेमाने (अध्यक्ष, वैद्यकीय प्रकोष्ठ), संतोष भालेराव (अध्यक्ष,अभियंताप्रकोष्ठ), हरीश आप्पा मोरे(संयोजक,वक्तृत्व प्रशिक्षण प्रकोष्ठ) आणि अंकुश शिर्के (अध्यक्ष,दिव्यांग सेल) यांना नियुक्तीपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

**वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत निर्धार:**शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी स्पष्ट केले की,राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडमध्ये संघटन विस्तार आणि जनसेवा हेच ध्येय समोर ठेवून काम सुरू आहे. या कार्यक्रमास संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस मधुकर बच्चे, सरचिटणीस वैशाली खाडये, वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव,अनुप मोरे, राजू दुर्गे यांच्यासह भाजपचे ज्येष्ठ नेते, आजी-माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महापालिकेच्या भवनावर खासगीकरणाच्या दुकानाचा फलक लावा

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शहराध्यक्ष चेतन पवार. कडक उन्हात हजारो शिवसेनेचा १८ जून रोजी कार्यकर्त्यांचा जागर मोर्चा

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९



**पिंपरी:पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दुकानातील आरक्षित भूखंड भाडेतत्त्वावर देत आहोत असा फलक मनपा भवनावर लावावा, तसेच ज्या संस्थेला व ज्या मोठ्या कारभाऱ्यांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी त्वरित लाभ घ्यावा, असेही आवाहन आयुक्त यांनी करावे अशी उपरोधित टीका शिव-सेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख चेतन पवार यांनी केली.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि शिक्षण विभागात असणारा भ्रष्टाचार आणि भोंगळ कारभाराबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वे-ळोवेळी आयुक्तांकडे तक्रार केली आहे. परंतु झोपेचे सोंग घेतलेल्या या प्रशासनाला जागे करण्यासाठी जागर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.या मोर्चानंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना चेतन पवार यांनी सांगितले की,पुनावळे येथील मनपा शाळेसाठी आरक्षित भूखंड खासगी संस्थेला देऊ नये. तिथे गोरगरिबांच्या मुलांसाठी मनपाने शाळा सुरू करावी.या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने अनेक वेळा आयुक्तांना पत्र देऊन, पत्रकार परिषद घेऊन देखील विरोध दर्शविण्यात आला होता.

तरी देखील सोमवारी सर्वसाधारण सभेत तुटपुंज्या रकमेवर ९१ गुंठ्यांचा हा आरक्षित भूखंड ३० वर्षाच्या मुदतीवर नाममात्र भाडेकराराने देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. याला राष्ट्रवादी कॉंग्रेसने विरोधी पक्ष म्हणून सभागृहात विरोध करायला हवा होता. परंतु राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा भाजपची बी टीम असल्याने त्यांनी विरोध केला नाही आणि बहुमताच्या जोरावर या प्रशासनाने ठराव मंजूर केला. यासाठी कोणत्या आमदारांचा, वरिष्ठांचा दबाव होता हे आयुक्तांनी जाहीर करावे आणि या मनपा हद्दीतील उर्वरित सर्व भूखंड देखील मोठ्या कारभाऱ्यांना आणि त्यांच्या संस्थेला देण्यासाठी आरक्षित भूखंड भाड्याने देण्याचे दुकान उघडल्याचा फलक मनपा भवनावर लावावा असे चेतन पवार यांनी सांगितले.

तसेच दापोडी येथील सर्वे नंबर १६,१७ मधील क्रीडांगणाचे आरक्षण मनपाने ताबडतोब विकसित करावे,हे आरक्षण देखील खाजगी संस्थेला किंवा कारभाऱ्यांना देण्याची भीती आहे.ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळा मनपा शिक्षण विभागाकडे वर्ग करून शिक्षण विभागाने तेथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य,खेळाचे साहित्य,ग्रंथालय,प्रयोगशाळा उप-लब्ध करून द्यावी.मनपा शिक्षण विभागाच्या वतीने मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गणवेश आणि शालेय साहित्य याची फेरनिविदा काढावी. पवना,इंद्रायणी नदी प्रदूषित असणाऱ्या जागेवर कचरा टाकला जातो. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. तेथे कचरा टाकने बंद करावे. शहरातील सर्वच नाल्यांची साफसफाई करावी.ताथवडे येथे (सर्वे नंबर ६४/२/१) ''ड'' प्रभाग कडून खासगी कन्सल्टंट चा अभिप्राय घेऊन नाला शिफ्ट करण्यात आला. तेथे नाला वळविण्यात आल्यामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे. येथील नागरिकांना त्रास देऊन हे सर्व बिल्डर च्या फायद्यासाठी केले आहे. या प्रकल्पाचा बांधकाम परवाना ताबडतोब रद्द करावा अशी मागणी येथील नागरिकांची आहे.या जागर मोर्चा पारंपरिक वाद्यांचा गजर करीत पोतराजाचा वेष परिधान करून प्रशासनाच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या.या मोर्चामध्ये सर्व निष्ठावंत शिवसैनिक आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रेरणा परिवार सोशल फाऊंडेशन,प्रेरणा को-ऑप.बँक लि.यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थाचा सत्कार



**थेरगाव:-प्रेरणा परिवार सोशल फाऊंडेशनप्रेरणा को-ऑप. बँक लि.यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी ओंम दत्तात्रय कांबळे यांनी १० वी मध्ये ७६.८० टक्के गुण मिळाल्याबदल यांचा गौरवचिंन्ह देऊन जाहिर सत्कार करताना कांतीलाल गुजर चेअरमन प्रेरणा को-ऑप.बँक लि.तसेच सर्व पदाधिकारी व नगरसेविका सौ.शालिनीताई कांतीलाल गुजर,आदिमान्यवर व्यक्ती यावेळी उपस्थित होते.**

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**थेरगाव:-प्रेरणा परिवार सोशल फाऊंडेशनप्रेरणा को-ऑप. बँक लि.लक्ष्मणनगर,यांच्या वतीने नुकतेच बँकेचे सभासद असलेल्या परिवारातील गुणवंत विद्यार्थी गौरवचिन्ह २०२६ इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत मिळविलेल्या उज्वल यशाबद्दल त्यांचा जाहिर सत्कार करण्यात आला.**

यावेळी प्रेरणा परिवाराच्या संस्थापक व प्रेरणा को-ऑप.बँक लि.प्रेरणा शिक्षण संस्था प्रेरणा प्रतिष्ठान प्रेरणा ना. सह.पतसंस्था लि.प्रेरणा वारकरी शिक्षण संस्थाचे कांतीलाल गुजर चेअरमन प्रेरणा को-ऑप.बँक लि.संस्थापक अध्यक्ष प्रेरणा परिवार सोशल फाऊंडेश. नगरसेविका सौ.शालिनीताई कांतीलाल गुजर,गबाजी भिवाजी वाकडकर,तानाजी सोनवणे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेरणा को-ऑप. बँक लि.साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे आदी मान्यवर व्यक्ती यावेळी उपस्थित होते.

